### रक्तदान चळवळीत उल्लेखनीय कार्याबद्दल

# महेश कुवर यांचा आरोग्य मंत्र्यांनी केला सत्कार

■ मोलगी, ता.अक्कलकुवा । वार्ताहर



अक्कलकुवा ग्रामिण रुग्णालयातील एकात्मिक चाचणी व समुपदेशन केंद्राचे समुपदेशक महेश कुवर हे नंदुरबार जिल्ह्यात राबवित असलेल्या रक्तदान चळवळीची दखल घेऊन त्यांचा आरोग्यमंत्री ना.प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात गौरव करण्यात आला.

महेश कुवर गेल्या १५ वर्षापासुन अक्कलकुवा ग्रामिण रुग्णालयात एकात्मिक चाचणी व समुपदेशन केंद्राचे समुपदेशक म्हणून काम पाहत आहेत. महेश कुवर हे एच. आय. व्ही. एड्स या गंभीर आजाराबाबत समाजात, विद्यार्थ्यांत तसेच समलिंगी संबंध ठेवणारे पुरुष, यांच्यात मोठ्या प्रमाणावर जनजागृती करुन एच. आय.व्ही.एड्स या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. ते नियमित काम करत असतांना जिल्ह्यात सिकलसेल अनेमिया, थॅलेसिमिया आदी रुग्णांना रक्ताची गरज भासते तसेच गरोदर मातां, लहान बालके, अत्यावश्यक स्थितील रुग्ण, नियमित शस्त्रक्रिया आदी प्रकारच्या रुग्णांना रक्ताची गरज असते. जिल्ह्यात रुग्णांच्या नातेवाईकांचे रक्तदान करण्याचे प्रमाण अत्यल्प असल्यामुळे अत्यवस्थ स्थितीतील रुग्णांचे रक्तासाठी मोठया प्रमाणात हाल होत असतात ही बाब हेरुन महेश कुवर यांनी आपली जबाबदारी सांभाळत जिल्ह्यात रक्तादानाची चळवळ सुरु केली यात जिल्हा भरात विविध सामाजिक संघटना, युवा मंडळे, संस्था यांना प्रोत्साहीत करत रक्तदान शिबिरांचे यशस्वी आयोजन केले. त्यांनी १४ वर्षाच्या कालावधीत जिल्ह्यात तसेच लगतच्या गुजरात व मध्यप्रदेश या राज्यात सुमारे १२५ पेक्षा जास्त रक्तदान शिबिरांचे आयोजन करुन सुमारे ५५०० पेक्षा जास्त रक्त बॅगांचे संकल करुन रक्तदान चळवळीच्या माध्यमातून हजारो रुग्णांचे प्राण वाचविले आहेत. त्यांनी अक्कलकुवा तालुक्यात एका दिवसात चार रक्तदान शिबिरे तर एका महिन्यात तब्बल ११ शिबीरे घेऊन शेकडो रक्त बॅगांचे संकलन केले आहे. त्यांनी आतापर्यंत जिल्ह्यात व इतर ठिकाणी अनेक रक्तदान शिबीरे आयोजित केली आहेत. शहादा येथे रक्तदान शिबीर आयोजित करुन एका दिवसात ३०० रक्त बॅगांचे संकलन करुन जिल्ह्यात विक्रम केला आहे. तर कोरोनाच्या काळात रक्ताचा तुटवडा जाणवत असतांना त्यांनी त्या काळात सुमारे हजार पेक्षा जास्त रक्त बॅगांचे संकलनाचे काम केले आहे. या रक्तदान चळवळीतील उल्लेखनीय कार्याबद्दल महेश कुवर यांचा आरोग्यमंत्री ना.प्रकाश आबिटकर यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र देऊन गौरव केला. यावेळी आ.आमश्या पाडवी, आ.राजेश पाडवी, जिल्हाधिकारी डॉ.मिताली सेठी, पोलीस अधिक्षक श्रवण दत्त, आरोग्य उपसंचालक डॉ.कपिल आहेर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.विनय सोनवणे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.रविंद्र सोनवणे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.नरेश पाडवी आदी उपस्थित होते. महेश कुवर यांना सत्काराबद्दल वैद्यकीय अधिक्षक डॉ.जर्मनसिंग पाडवी, अक्कलकुवा ब्लड डोनेट गृपचे सुधीरकुमार ब्राम्हणे, रविंद्र गुरव, दिनेश खरात, जि.प.शिक्षक दिपक सोनवणे आदींनी अभिनंदन केले.

## ५५०० पेक्षा जास्त रक्त बॅगांचे केले संकलन



# प्रत्येक गाव सुशासनयुक्त व्हायला हवे-आ.राम भदाणे

### चौगाव-हिंगणेपासून मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा शुभारंभ

■ धुळे । प्रतिनिधी

सक्षम पंचायतराज व्यवस्था, लोकसहभाग, जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव, संस्थांचे बळकटीकरण, उपजीविका, ग्रामीण घरकुल योजना, महिला बचत गट सक्षमीकरण, लोकसहभाग आणि समाधान व नवोपक्रम राबवणे म्हणजेच प्रत्येक गाव सुशासनयुक्त व्हायला हवे. यामध्ये सर्व नागरिकांना डिजिटल सुविधा उपलब्ध व्हाव्यात. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातून महत्वपुर्ण सेवा ग्रामस्थांपर्यत पोहचणार आहे. असे प्रतिपादन आ. राम भदाणे यांनी सांगितले.

चौगाव ता.धुळे येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानास प्रारंभ झाला. यासाठी झालेल्या विशेष ग्रामसभेत आ. भदाणे बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश इंगळे, सरपंच ललिता बागले, गटविकास अधिकारी गणेश चौधरी सहाय्यक गटविकास अधिकारी आर. डी. वाघ, शिकाऊ सहाय्यक गटविकास अधिकारी शेख, माजी उपसभापती विद्याधर पाटील, भैय्यासाहेब मासुळे, अधिकार मासुळे, सोमनाथ चव्हाण, नरेश पाठक, भरत मासुळे, अर्जून मासुळे, प्रकाश मासुळे, अमोल मासुळे, अमोल खैरनार, गणेश खैरनार, अनिल मासुळे, बलराम कुळथे, समाधान बागले, डॉ. अजय कुमार देवरे, दीपक खैरनार, सुरेश बोरसे, मच्छींद्र बोरसे, भुषण मासुळे, प्रमोद शिंदे, हिंगणेचे विजय सोनवणे, रवींद्र सोनवणे, महेंद्र सोनवणे, सुदाम सोनवणे, विलास सोनवणे आदी पदाधिकारी होते.

आ. भदाणे पुढे म्हणाले की, या अभियानात गाव विभागसह राज्य पातळीवर प्रथम येण्यासाठी सर्व नागरिकांनी सहभागी व्हावे. शाश्वत विकासासाठी गावामधील सर्व नागरिकांच्या समस्या गावपातळीवर सोडवण्यात याव्यात. गावातील समस्या असतील तर त्या सोडविण्यासाठी कटिबद्धता आहे. या अभियानाच्या माध्यमातून पाणंद रस्ते, आरोग्य सुविधा आदींच्या माध्यमातून सुविधा पुरविण्यासाठी सारेच सरसावले असल्याचेही आ. भदाणे यांनी सांगितले.



# नवापुरात अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेमार्फत एल्गार

### ओबीसी प्रवर्गातील मराठा समाजाची बेकायदेशीर घुसखोरी थांबवा-प्रदीप चौधरी

■ नवापूर । श.प्र.

ओबीसी प्रवर्गातील मराठा समाजाची बेकायदेशीर घुसखोरी थांबवण्यासंदर्भात नवापूर तालुका अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेतर्फे तहसीलदार दत्तात्रय जाधव आणि पोलीस निरीक्षक अभिषेक पाटील यांना निवेदन देण्यात आले.

हैदराबाद गॅजेटीयरवरील शासन निर्णय तात्काळ रद्द करावा, ओबीसी कोट्यातून मराठा समाजाला आरक्षण देऊ नये, अन्यायकारक व पक्षपाती न्यायमूर्ती शिंदे समिती बरखास्त करावी, ओबीसी मध्ये नव्याने समाविष्ट केलेल्या ५८ लाख बोगस नोंदी रद्द कराव्यात, मराठा आरक्षणावर घेतलेल्या सहा लाख हरकतींचा खुलासा त्वरित करण्यात यावा यासारख्या विविध मागण्यांवर प्रकाशझोत टाकण्यात आला. लोकशाहीच्या मार्गाने निवेदन देऊन कोणताही बदल झाला नाही तर उग्र आंदोलन करण्याच्या देखील इशारा याप्रसंगी कार्यकर्त्यांनी दिला. कार्यक्रमाप्रसंगी बारा बलुतेदार जातीतील तालुकाध्यक्ष तसेच लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे तालुकाध्यक्ष प्रदीप जानकीराम चौधरी यांनी केले. याप्रसंगी प्रा.डॉ. नितीनकुमार माळी, पांडुरंग तानाजी कुंभार, मोहन चंदू बागुल, शांतीलाल ठाकरे, महेंद्र दुसाने सोनज भांडारकर, रामचंद्र ततार, महेंद्र जाधव, भावेश खैरनार, आतिश कुंभार, निखिल मिस्तरी, अमीन पठाण, कल्पेश थेटे, प्रमोद सोनार यांनी निवेदनावर स्वाक्षऱ्या करत घोषणा करण्यात आल्या.

# ब्राह्मणशेवगे येथे पंचायतराज अभियानाचा वृक्षारोपण करुन शुभारंभ

■ चाळीसगाव । प्रतिनिधी



राज्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान दि.१७ सप्टेंबर २०२५ ते दि.३१ डिसेंबर २०२५ दरम्यान राबवण्यात येत आहे. या अभियानात तालुक्यातील ब्राह्मणशेवगे गावानेही उस्फूर्तपणे सहभाग घेतला असून गावाने वृक्षारोपण करुन या अभियानाचा शुभारंभ केला.

या अभियानात सहभाग घेऊन शासनाने ठरवून दिलेल्या कालावधीत ग्रामपंचायती, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदा यांना त्यांच्या कामगिरीनुसार प्रोत्साहीत करुन त्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी शासनाने 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज' अभियान हाती घेतले आहे. राज्यात १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत हे अभियान राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जिल्ह्यातील ग्रामपंचायती, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषद यांच्यामार्फत हे अभियान राबविले जाणार आहे. दरम्यान, तालुकास्तरावर प्रथम तीन क्रमांक पटकावणाऱ्या ग्रामपंचायतींना अनुक्रमे १५ लाख, १२ लाख आणि ८ लाख रुपयांचे बक्षीस दिले जाणार आहे. तर जिल्हास्तरावर प्रथम येणाऱ्या ३ ग्रामपंचायतींना अनुक्रमे रु.५० लाख, ३० लाख, २० लाख, विभाग स्तरावरील प्रथम ३ क्रमांकांना अनुक्रमे रु.१ कोटी ८० लाख आणि ६० लाख तर राज्यस्तरावर प्रथम ३ क्रमांक पटकावणाऱ्या ग्रामपंचायतींना अनुक्रमे रु.५ कोटी, ३ कोटी आणि २ कोटी रुपये बक्षीस दिले जाणार आहे. लोकसहभाग हा या अभियानाचा मुख्य उद्देश असून लोकाभिमुख प्रशासन, नागरी सेवा-सुविधा केंद्रांना सेवा केंद्राचा दर्जा देणे, तक्रार निवारण, ग्रामपंचायत वेबसाईट, सीसीटीव्ही, दफ्तर व लेखे अद्ययावतीकरण, आयुष्यमान भारत कार्ड वितरित करणे, ५, १०, १५ टक्केच्या योजनांचे प्रभावी कामकाज करणे, कर आणि पाणीपट्टी १०० टक्के वसुली करणे, सर्व शासकीय संस्थांनी लोकसहभागासाठी प्रयत्न करणे, स्व-उत्पन्न वाढविणे, वॉटर बजेट, पिण्याचे शुद्ध पाणी पुरविणे, नळपाणी योजना, स्ट्रीटलाईट थकबाकी शून्य करणे, पंतप्रधान आवासची कामे पुढे नेणे, इत्यादींबाबतचे गुणांकन त्रयस्थ यंत्रणेमार्फत केले जाणार आहे. याप्रसंगी गावातील नागरिक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झालेले होते. या अभियानात ब्राह्मणशेवगे गावाने सहभागी होऊन लोकसहभागातून शासनाने ठरवून दिलेले निकष पूर्ण करण्याचा व बक्षीस मिळवण्याचा निर्धार केला आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' वर २० लाखांचे सोफासेट; विरोधी पक्षाची टीका

■ मुंबई । प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे शासकीय निवासस्थान असलेल्या वर्षा निवासस्थानी जवळपास २० लाखाहून अधिक किमतीचे सोफासेट खरेदी करण्यात येणार आहेत. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुंबई इलाखा शहर विभागाने निविदा जारी केली आहे. या निर्णयावर विरोधी पक्षाने टीकास्त्र सोडले आहे. जारी झालेल्या निविदेनुसार वर्षा निवासस्थानी डबल बेड मॅट्रेससह ८ बेड, ४ डबल सीट सोफा सेट, २ सिंगल सीट सोफा सेट, १५ खुर्चा आणि ६ टेबल खरेदी केले जाणार आहेत. त्यासाठी २० लाख ४७ हजार रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. याशिवाय 'वर्षा'वरील स्वयंपाक घर दुरुस्तीसाठी १९ लाख ५३ हजार रुपये किंमतीची निविदा काढण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी या निर्णयावर टीका केली आहे.

# जी.टी.पाटील महाविद्यालय आत्मनिर्भर व विकसित भारताचा मार्ग कार्यशाळा

■ नंदुरबार । प्रतिनिधी



येथील जी.टी. पाटील महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव अजिवन अध्ययन व विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात राष्ट्रीय एकात्मता:आत्मनिर्भर व विकसित भारताचा मार्ग या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा झाली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एम.जे.रघुवंशी उपस्थित होते. त्यांनी आपल्या अध्यक्ष मनोगतात राष्ट्रीय एकात्मता कशा पद्धतीने विकसित भारताचा कणा आहे. हे विद्यार्थ्यांना सांगितले.

याप्रसंगी हिंदी विषयाचे अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा.डॉ. संजय शर्मा यांनी प्रमुख वक्ते म्हणून विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकात्मतेतून आत्मनिर्भर भारताचे स्वप्न कसे साकार होणार हे समजून सांगितले. दुसरे प्रमुख वक्ते पूज्य साने गुरुजी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. गौतम कुवर यांनी विकसित भारताचा मार्ग या विषयावर मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ.संदीप पाटील उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यशाळेचे समन्वयक प्रा. डॉ.एम. आर. पाटील यांनी केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. डी.बी. देवरे यांनी केले तसेच आभार डॉ.विजय चौधरी यांनी केले. यशस्वीतेसाठी डॉ.जी.एच.बळदे, डॉ. एस.व्ही. मिश्रा, डॉ. वाय.व्ही.मराठे, डॉ.एन.पी.हुसे यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.



# जैताणे-निजामपूर येथे भाजपातर्फे सेवा पंधरवडा

■ निजामपूर । वार्ताहर

साक्री तालुक्यातील जैताणे मंडळ येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवडा निमित्ताने निजामपूर येथील जि.प.शाळा येथील अर्धाकृती छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची व परिसराची स्वच्छता करण्यात आली तसेच ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार,येथील जैताणे ग्रामिण रुग्णालय येथे परिसरात वृक्षारोपण, रूग्णांना फळवाटप करण्यात आले. जिल्हा परिषद शाळा निजामपूर येथे वृक्षारोपण, स्वच्छता विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यावेळी मंडळ अध्यक्ष चंद्रकांत पवार, निजामपूर शहर अध्यक्ष नयनभाई शहा, जैताणे शहर अध्यक्ष बाजीराव पगारे, रमेश राणे, अजित शाह, डॉ.रमाकांत शिरोडे, गजानन शाह,चिंधू शिंपी,त्रिलोक दवे, नानाभाऊ बच्छाव, नवल खैरनार, दिलीप पवार, राकेश शेवाळे, निलेश राणे, सुशिल राणे, विशाल सुर्यवंशी, केवूर भावसार,निलेश जयस्वाल उपस्थित होते.

## विधीलिखित

सुरेशराव बोरकर,
ब्रह्मांड ज्योतिष कार्यालय,
रावेर. मो. : ९८५००१५५५८

शुक्रवार, दि. १९ सप्टेंबर २०२५

*-*-* दैनंदिन राशिभविष्य *-*-*

**मेष** – आजचा दिवस सौभाग्यवती आईंना नमस्कार करावा.
**वृषभ** – आज आपले घरातील ज्येष्ठ स्त्रीला नमस्कार करावा.
**मिथुन** – पूर्वजांच्या स्मरणार्थ खर्च करावा.
**कर्क** – पूर्वजांच्या नावाने धर्म-कार्य करावे.
**सिंह** – पूर्वजांविषयीच्या संस्काराप्रमाणे वागावे.
**कन्या** – घराण्याची देवता यांचेच पूजन करावे.
**तूळ** – पूर्वजांच्या वस्तुंची साफसफाई करावी.
**वृश्चिक** – मनातील भावनांना स्पष्टता द्यावी.
**धनू** – नको त्या दिशेकडे जाण्याची शक्यता?
**मकर** – संसाराच्या कार्यासाठी वेळ काढावा.
**कुंभ** – शारीरिक अस्वस्थता जाणवू लागेल.
**मीन** – संतती मार्ग पूर्वजांच्या मार्गातूनच जाईल.




**AMALNER :** Vikas lottery & Gen. store : 8999612300 | **AHILYANAGAR :** Lucky lottery - 9423792145, Tulsi Lottery Agency - 9921198992 | **ANDHERI :** Megastar Distributor - 9967250008 **AMARAVATI :** New Hindustan Lottery - 7507867972 | **BORIWALI :** Diamond Corporation - 8657436773 | **BHAYANDER :** Balaji Sankari Agency - 9833213081 | **CHANDRAPUR :** Mahalaxmi Agency - 94221 36124/7558215696 | **DADAR :** Shree Ganesh Enterprises - 9870017798, Shree Siddhi Samarth Agency - 93261 96320, Ambika Lottery - 70457 19586, Shree Enterprise - 8422996345 | **DHULE :** Agarwal Lottery Agency - 9422706933 / 8766776900 | **GOREGAON :** Vishesh Distributers - 7900123332, Lambodar Enterprises - 9819224257, Multistar Distributor - 9930425378 | **GONDIA :** R.K. Lottery Mandi - 9325116868 | **GIRGAON :** Trimurti Lottery Agency - 9773373267, B.V. Kothavale - 9820629401| **ICHALKARANJI :** Maharaja Associates- 9028485789, Maharaja LotteryCentre-9764662643/ 9158729426 | **JALGAON :** Vyas Agency - 9890056854, Baheti Lottery - 9420389239 | **KOLHAPUR :** Mahavir Lottery Agency - 9822248473, 7066275145 | **KALYAN :** Prince Lottery - 9819574813 | **KALBADEVI :** Mewad Agency - 9833253514 | **KHAMGAON :** Matoshree Enterprises - 9922813194 | **MUMBAI :** Prince Agency - 9833748152 | **NERUL :** Shree Ganesh Krupa Agency - 9920116957 | **NAGPUR :** Lottery Bhandar - 9764688000, Balaji Marketing - 9371034883, Siraj Enterprises - 9822472123 | **NANDED :** Jagdamba Lottery Centre - 8956486986 , Prasad Enterprises - 9421908570, Shree Sai Krupa Lottery Agency - 9822767566, | **NASHIK :** Chirag Enterprises - 9168199999 | **CHHATRAPATI SAMBHAJI NAGAR :** Rukmini Enterprises - 9822899520/800705911l, Komal Agency - 9370224810 | **SOLAPUR :** Barad Lottery Agency - 9420545869/9850501313 | **PANVEL :** Phatak Enterprises - 9167552882 | **PUNE :** Shri Gurudev Datta Lot. Agency - 9518591612, Parihar Enterprises - 9422517486, Kamal Agency - 830492061, Amit Lottery Agency - 9422087688 | **SANGLI :** Kishor M Shah - 8055204763 / 552529044 | **SATARA :** Samrat Agency - 8805277966 | **YAWATMAL :** New Jai ambe Lottery Bhandar - 9421844726

अधिक माहितीसाठी कॉल करा (टोल फ्री) - 1800 266 0088
Mumbai - 8754562382 / 7845827316 / 8928588642 7397776862 /9372275063, Solapur - 8805060191, Kolhapur - 9922431881, Nagpur - 9922090691 / 7845827259

देशदूत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि.यांच्याकरिता सकाळ मीडिया प्रा.लि., प्लॉट नं.सी-३, एम.आय.डी.सी.एरिया टेलिफोन एक्सचेंजसमोर, औरंगाबाद रोड, जळगाव-४२५००३ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करुन देशदूत कार्यालय, ग.नं.६ राणी मेडिकलजवळ, धुळे-४२४००१ येथे प्रसिध्द केले. ● **संपादक : हेमंत दिनेश अलोने***. **फोन नं.**: धुळे-२३७९१४, फॅक्स-२३८९१४, नंदुरबार-२२११०१, जळगाव शहर कार्यालय-२२२८७८१, २२२४६६०, भुसावळ-२२०६८०, २२४७९५, रावेर-२५०४४४. **RNI.No. 68336/1998.** (* पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.)